## परिशिष्ट क्रमांक - एक

## विधानपरिषद सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत

## तदर्थ समितीची रचना व कामे

**समितीची रचना.--** (१) प्रत्येक वर्षी, विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या किंवा यथास्थिती नवीन रचना करण्यात आलेल्या विधानपरिषदेच्या पहिल्या अधिवेशनाच्या प्रारंभानंतर, शक्य तितक्या लवकर, सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समितीची रचना करण्यात येईल;

(२) ही समिती १५ पेक्षा अधिक नसतील इतक्या सदस्यांची मिळून होईल. या समितीवर एकूण आठ सदस्य असून मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद हे या समितीचे समितीप्रमुख राहतील. मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद, मा.संसदीय कार्य मंत्री व मा.संसदीय कार्य राज्यमंत्री हे या समितीवर विशेष निमंत्रित राहतील. मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय हे या समितीवर समिती सदस्य म्हणून राहतील. प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, हे या समितीचे सदस्य सचिव (Member Secretary) म्हणून राहतील.

(३) समितीचे सदस्य नवीन समितीची रचना होईपर्यंत पद धारण करतील.

**समितीची कामे. --** सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे ठेवण्याबाबत तदर्थ समितीची कामे पुढीलप्रमाणे असतील:--

संविधान, अधिनियम, नियम, आदेश इत्यादी अन्वये सभागृहाच्या पटलावर कागदपत्रे वेळीच ठेवली जातात का? नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत? त्यासाठी संबंधितांकडून देण्यात आलेला खुलासा समाधानकारक आहे काय? या अनुषंगाने सर्व बाबींची सखोल तपासणी करुन सभागृहाला वेळोवेळी अहवाल सादर करणे.

..२/-

## सदस्यांची सूची

**समिती प्रमुख**

(१) डॉ.नीलम गोऱ्हे, मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद.

**सदस्य**

(२) श्री.अमोल मिटकरी, वि.प.स.
(३) श्री.अभिजित वंजारी, वि.प.स.
(४) श्री.जयंत आसगावकर, वि.प.स.
(५) श्री.रामराव पाटील, वि.प.स.
(६) रिक्त
(७) रिक्त
(८) रिक्त

**विशेष निमंत्रित**

(१) श्री.अंबादास दानवे, मा.विरोधी पक्ष नेता, महाराष्ट्र विधानपरिषद.
(२) श्री.चंद्रकांत पाटील, मा.उच्च व तंत्रशिक्षण, वस्त्रोद्योग, संसदीय कार्य मंत्री.

- मा.उप सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद या समितीच्या समिती प्रमुख राहतील.
- मा.विरोधी पक्ष नेता, विधानपरिषद व मा.संसदीय कार्य मंत्री हे या समितीवर विशेष निमंत्रित राहतील.
- मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन, मंत्रालय हे या समितीवर सदस्य म्हणून राहतील.
- प्रधान सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय हे या समितीचे सदस्य सचिव (Member Secretary) म्हणून राहतील.